130

# महाराष्ट्र शासन

क्र. सीएसएल-२०१५/प्र.क्र. १८५/१३-स,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२.
दिनांक :- ०१/०८/२०१५.

वाचा : (१) महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अधिनियम, २०१५, सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २४, दिनांक ३१/०७/२०१५.

(२) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र. निवडणूक/सह. संस्था.नि./२३४/२०१५, दिनांक ०१/०८/२०१५ चे पत्र.

## आदेश

ज्याअर्थी, राज्यात खरीप २०१५ मध्ये काही जिल्ह्यांत अवर्षणाची परिस्थिती असून अशा जिल्ह्यात दुबार पेरणी करावी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच राज्याच्या अन्य काही जिल्ह्यात सर्वसाधारण पाऊस असल्यामुळे अशा जिल्ह्यातील शेतकरी खरीप पिकाच्या कामामध्ये व्यस्त आहेत; आणि

ज्याअर्थी, शेतकऱ्यांशी संबंधित असलेल्या व कार्यक्षेत्राची व्याप्ती तसेच सभासद संख्या मोठी असलेल्या महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम, २०१४ मधील नियम ४ मध्ये नमुद केलेल्या "अ" वर्गातील सहकारी संस्थांची निवडणुक प्रक्रिया चालू ठेवल्यास अशा संस्थांच्या निवडणुक प्रक्रियेत सभासद शेतकऱ्यांच्या सहभागावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अशा संस्थांची निवडणुक घेणे लोकहिताच्या दृष्टीने योग्य नसल्यामुळे या संस्थांची निवडणुक काही काळासाठी पुढे ढकलणे आवश्यक असल्याची शासनाची खात्री झाली आहे; आणि

ज्याअर्थी, टंचाई, अवर्षण, पूर, आग किंवा इतर नैसर्गिक आपत्ती किंवा पावसाळा इत्यादी कारणास्तव सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे कोणत्याही संस्थेच्या किंवा संस्था वर्गाच्या निवडणुका एका वेळी ६ महिन्यापेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीपर्यंत पुढे ढकलण्याचा महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अधिनियम, २०१५ नुसार शासनास अधिकार प्राप्त आहे;

त्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनिमय, १९६० मधील कलम ७३ कक अन्वये शासनास प्राप्त असलेल्या अधिकारानुसार राज्यातील काही जिल्ह्यातील अवर्षण व काही जिल्हयातील पावसाची परिस्थिती विचारात घेऊन महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम, २०१४ मधील नियम ४ मध्ये नमूद केलेल्या वर्ग "अ" मधील ज्या सहकारी संस्थांच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीच्या बाबतीत नामनिर्देशनाचा टप्पा अद्याप सुरु झालेला नाही अशा सर्व सहकारी संस्थांच्या (ज्या सहकारी संस्थांच्या बाबतीत मा. न्यायालयाने निवडणुक घेण्यासंदर्भात निश्चित असे आदेश दिलेले आहेत अशा संस्था वगळून) संचालक मंडळाची निवडणुक या आदेशाच्या दिनांकापासून दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१५ पर्यंत पुढे ढकलण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( संतोष पाटील )
विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र शासन

कृ.मा.प.